# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-३०५/२०२३

**अपिलार्थी, श्री.किरण सर्जेराव भोसले,**
**१६ बी, भारत इस्टेट, हॉटेल ताज पॅलेस च्या समोर,**
**ए.जी.लिंक रोड, असल्फा व्हिलेज, घाटकोपर (प),**
**मुंबई ४०० ०८४.**

विरुध्द

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखापरिक्षण वर्ग-२, अ/विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरिक्षण), मुंबई विभाग, मुंबई, कोकण भवन, सहावा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. | प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विशेष लेखापरिक्षक वर्ग १, अधिन विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरिक्षण), मुंबई विभाग, मुंबई, कोकण भवन, सहावा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. |

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक** : २१.४.२०२६

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३.१०.२०२२ | ९.११.२०२२ | २३.११.२०२२ | ६.१.२०२३ |

अपिलार्थी यांनी दि. २.२.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिल्याने." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच नुकसान भरपाई देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. कृष्णा रामु खिलारी, लेखा परिक्षक श्रेणी-१, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरिक्षण), मुंबई विभाग, मुंबई, कोकण भवन हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(१. विशेष लेखापरिक्षक वर्ग १, श्री.दयानंद चिंचोलीकर यांची मार्च २०१३ ते ऑगस्ट २०२२ अखेरची दैनंदिन कामकाजाची डायरीची सत्यप्रत मला देण्यात यावी. २. श्री. दयानंद चिंचोलीकर यांनी मार्च २०१३ ते ऑगस्ट २०२२ अखेर आपल्या कार्यालयास सादर केलेल्या दैनंदिन कामकाजाच्या डायरीची दिनांक व आवक जावक क्रमांकाची सत्यप्रत देण्यात यावी.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थीनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.६.१.२०२३ रोजी सुनावणी घेऊन, "अपिलार्थी यांचे प्रथम अपिल अमान्य करून निकाली काढण्यात येत आहे." असे आदेश पारित केले आहेत.

या प्रकरणी विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. कृष्णा रामु खिलारी, लेखा परिक्षक श्रेणी-१, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरिक्षण), मुंबई विभाग, मुंबई, कोकण भवन यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही वैयक्तिक स्वरूपाची असल्याने ती पुरविण्यासंबंधी श्री. दयानंद चिंचोलीकर यांना दि.१०.१०.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे विचारणा करण्यात आली होती. तथापि, श्री. दयानंद चिंचोलीकर यांनी त्यांच्या दि.१७.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये त्यांची वैयक्तिक माहिती कोणासही देण्यात येऊ नये असे जन माहिती अधिकारी यांना कळविले होते. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली नाही.

सबब, श्री. दयानंद चिंचोलीकर यांनी सदरची माहिती पुरविण्यास हरकत घेतली असल्याने त्यांचे म्हणणे जाणून घेणे आवश्यक आहे. सबब, श्री.दयानंद चिंचोलीकर यांना पुढील सुनावणीची नोटीस काढण्यात यावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१९.५.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**श्री. दयानंद एस. चिंचोलीकर, विशेष लेखापरिक्षक वर्ग-१,**
**सहकारी संस्था (मत्स्य), मुंबई,**
**विशेष कार्य अधिकारी, लेखा परिक्षा मंडळ (पदुम), मुंबई,**
**प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, खान अब्दुल गफार खान रोड, वरळी सीफेस, मुंबई ४००० १८**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ